संक्षिप्त

केळावणमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

नाशिक : केळावण येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ नाशिक यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य आणि दप्तर, शाळेचा आणि खेळाचा गणवेश यांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास रोटरी क्लबच्या अध्यक्षा शिल्पा पारेख तसेच व्यवस्थापक रोहित देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगीराज चौधरी, समिती सदस्य, महिला वर्ग, ग्रामस्थ तसेच पोलीस पाटील विजुभाऊ चौधरी उपस्थित होते.

अनुराधा जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

नाशिक : येथील मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने खुटवडनगर येथील सनशाईन स्कूलच्या संचालिका अनुराधा जाधव यांना आदर्श शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जुना आडगाव नाका येथील दीपलक्ष्मी मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास गोखले एज्युकेशन सोसायटीचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी, भाजप कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष पंकज खताळ, संस्थेच्या संस्थापिका मेघा शिंपी हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास साधणारे शिक्षक नेहमीच स्मरणात राहतात. विद्यादानाच्या पवित्र क्षेत्रातील कार्याबद्दल अभिमान असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

लीलावती मोगरे यांचे निधन

नाशिक : येथील यशवंत व्यायाम शाळेचे व्हॉलीबॉल खेळाडू तथा मायको (बॉश) कंपनीचे कर्मचारी अशोक लक्ष्मण मोगरे यांच्या पत्नी लीलावतीताई (५६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, सासू, मुलगा, सून, दोन नातवंडे, मुलगी, जावई असा परिवार आहे.

पुष्पावती रुंगटा शाळेत 'जल्लोष लोककलेचा'

नाशिक : महाराष्ट्राची संस्कृती ही शेकडो वर्षांच्या समृद्ध लोककला परंपरेने नटलेली आहे. गोंधळ, भारुड, लावणी, पोवाडा, कोळीगीते, धनगरी नृत्य, वाघ्या-मुरळी आणि लेझीम यांसारख्या लोककलांचा नव्या पिढीला परिचय व्हावा या अनुषंगाने बालरंगभूमी परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे बाल व युवा कलाकारांसाठी 'जल्लोष लोककलेचा' (नृत्य - वादन - गायन) या विशेष महोत्सव १९ सप्टेंबर रोजी पुष्पावती रुंगटा शाळेत होणार आहे.

एकल वादन, एकल नृत्य, एकल तसेच समूह गायन, समूह नृत्य सादर केले जाणार आहेत. स्पर्धेतील गुणवंत कलाकारांना पारितोषिके देऊन गौरविणार असून विजेत्यांना दोन आणि तीन ऑक्टोबर रोजी मुंबईत अंतिम फेरीत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. प्रवेशाची अंतिम तारीख १५ सप्टेंबर आहे. लोककला नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि तिचे संवर्धन करणे ही आपली सांस्कृतिक गरज असल्याने महोत्सवात जास्तीत जास्त शाळांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन बालरंगभूमीचे अध्यक्ष महेश डोकफोडे, नाशिक शाखेते प्रमुख कार्यवाह केतकी कुलकर्णी, कार्याध्यक्ष विनोद राठोड आणि खजिनदार संजय भुजबळ यांनी केले आहे.

बैलपोळ्यावर दुष्काळ, महागाईचे सावट

साज साहित्य दरात २५ टक्क्यांनी वाढ

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : बळीराजाच्या बरोबरीने काळ्या मातीत वर्षभर राबणाऱ्या सर्जा-राजाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण म्हणजे बैलपोळा. मात्र, यंदा निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नाशिक जिल्ह्यात मालेगावसह इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांमध्ये या सणाचा निरुत्साह दिसून येत आहे. पावसाने सव्वा महिन्यापासून ओढ दिल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. अशा स्थितीत एकीकडे पिके वाचविण्याची चिंता सतावत असतानाच बैलपोळ्याच्या तोंडावर सर्जा-राजाच्या साजशृंगाराच्या साहित्य दरात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

यंदा पावसाचे प्रमाण अत्यंत कमी राहिले आहे. श्रावणात तर नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी परिसरात अधूनमधून येणाऱ्या श्रावण सरींचा अपवाद वगळता जिल्ह्यात इतरत्र पावसाची तीव्र गरज आहे. मालेगाव तालुक्यात तर संपूर्ण श्रावण महिना कोरडा गेला. कळवण, बागलाण, मालेगाव, देवळा आणि नांदगाव या तालुक्यांमधील कोरडवाहू शेतीबरोबरच बागायती शेतीलाही मोठा फटका बसला आहे. पावसाचा मोठा खंड पडल्याने अनेक ठिकाणी पिके करपल्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता स्पष्टपणे दिसत आहे. शेतीमालाला बाजारात आधीच अपेक्षित भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना उत्पन्नाची कोणतीही हमी उरलेली नाही, त्यातच पावसाअभावी आता कांदा, मका यासारखी पिके धोक्यात आल्याने बळीराजासमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे.

शेतमालाचे घसरलेले दर, वाढती महागाई आणि पावसाची दडी यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. त्यामुळे यंदा बैलपोळ्याची खरेदी अत्यंत हात राखून केली जात आहे. दरवर्षी गजबजणाऱ्या बाजारपेठेत यंदा फारसा उत्साह नाही. व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. तांबे आणि पितळासह कच्च्या मालाच्या किंमती वाढल्याचा परिणाम यंदा बैल सजावटीच्या साहित्याच्या दरावर झाला आहे. पितळी गेज, घुंगरू माळा यांसारख्या वस्तूंचे दरही गतवर्षाच्या तुलनेत वाढले आहेत. पूजेसाठी लागणाऱ्या मातीच्या आणि प्लास्टरर ऑफ पॅरिसच्या बैलजोड्यांच्या किमतीतही गेल्या वर्षाच्या तुलनेत जवळपास २५ टक्के वाढ झाली आहे.

बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथे बाजारपेठेवर महागाईचे पडसाद दिसून आले. त्यामुळे बैलांचा साजशृंगार विक्रीलाही फारसा प्रतिसाद मिळाला नाही. (छायाचित्र- यतीश भानू)

शेतकरी निरुत्साही

शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक महत्त्वाचा असलेला सण म्हणजे बैलपोळा. शेतीचे कितीही यांत्रिकीकरण झालेले असले तरी आजही शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे स्थान कायम आहे. यंदा महागाई आणि अपुरा पाऊस यामुळे बैलपोळा साजरा करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये असलेला उत्साह कमी झाला आहे. त्याचा परिणाम पोळ्यानिमित्त साजशृंगाराचे साहित्य विक्री करणाऱ्यांनाही बसला आहे.

'भावनांचे प्रकट शब्दरूप म्हणजे साहित्य'

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : सभोवतालचा निसर्ग आणि आपली परिस्थिती आपल्याला धैर्य, चेतना, स्वावलंबन शिकवत असते. मनात साचलेलं दु:ख, वेदना आणि वेगवेगळ्या भावना मांडण्यासाठी साहित्याची नितांत गरज असते. म्हणजेच साहित्य म्हणजे अंतःकरणातील भावनांचे प्रकट शब्दरूप आहे, असे प्रतिपादन महानुभाव पंथाचे व्यासंगी अभ्यासक ज्येष्ठ साहित्यिक प्रा. बाळकृष्ण अंजनगावकर यांनी केले.

येथील ऋतुरंग सभागृहात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिकरोड शाखेचे अध्यक्ष उन्मेष गायधनी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या 'संवाद सृजनाशी' या मालिकेच्या दुसऱ्या पर्वातील ४० वे पुष्प प्रा. अंजनगावकर यांनी गुंफले. शाखेचे उपाध्यक्ष कवी रवींद्र मालुंजकर यांच्या हस्ते वक्ते प्रा. अंजनगावकर यांचा सन्मान करण्यात आला.

'नाशिकरोडवर स्वतंत्र लेखन हवे'

बालपणापासून झालेल्या समतेच्या संस्कारांचे प्रतिबिंब साहित्यात उमटले. चक्रधर स्वामींचे समतेचे विचार सांगणारा महानुभाव पंथ हा खऱ्या अर्थाने साहित्य संप्रदाय आहे. मराठी साहित्यनिर्मितीत महानुभाव पंथाचे योगदान अनन्यसाधारण असून मराठी ही संजीवन भाषा आहे. नाशिकरोड मसाप शाखेने केलेल्या कार्याची जाणीव शासनाने ठेवत शाखेला भूखंड प्रदान केला आहे, याचा आनंद व्यक्त करून नाशिकसह नाशिकरोड हेही स्वतंत्र शहर आहे. त्यालाही स्वतंत्र इतिहास आहे. या नाशिकरोडवर स्वतंत्रपणे लिहायला हवे, अशी अपेक्षा प्रा. अंजनगावकर यांनी व्यक्त केली.

सलोखा परिषदा राज्यभर घेण्याची गरज

डॉ. धम्मसंगिनी गोरख यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : आरक्षण उपवर्गीकरण हा विषय अनुसूचित जातींच्या समन्वयातून सोडविणे गरजेचे असून त्यासाठी राज्यभर सलोखा परिषदा घेण्याचा निर्धार करण्याची गरज आहे. अनुसूचित समूहामध्ये अंतर्गत वाद-विवाद निर्माण केला जात आहे. समाजमाध्यमांतील संदेश यात भर टाकत असून यामुळे समाजात द्वेष भावना निर्माण होत आहे. यामुळे सलोखा परिषदेचे महत्त्व वाढले असून ज्यांचे प्रश्न आहेत त्या समूहांनी समन्वयाने हा प्रश्न सोडवायला हवा, असे आवाहन अभ्यासक डॉ. धम्मसंगिनी रमा गोरख यांनी केले.

येथे अनुसूचित जाती समन्वयाची सलोखा परिषद अनुसूचित जाती समन्वय समिती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर), स्थानिक स्वराज्य संघटना, सत्यशोधक बहुजन आघाडी, मांग-गारुडी सामाजिक संस्था आणि बुरुड समाज संस्था यांच्या सहकार्याने पार पडली. परिषदेचे उद्घाटन सत्यशोधक बहुजन आघाडीचे संस्थापक सचिन बगाडे यांनी केले. अध्यक्षस्थान रिपाइंचे (सेक्युलर) संस्थापक अध्यक्ष श्यामदादा गायकवाड यांनी भूषविले.

यावेळी डॉ. गोरख यांनी, बदर समितीचा अहवाल अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. आणि जातवार जनगणना झालेली नसल्याकडे लक्ष वेधले. या पार्श्वभूमीवर या समूहातील अनुभव, अभ्यास असलेल्या लोकांनी एकत्रिपणे मार्ग काढायला हवा, असेही डॉ. गोरख यांनी सांगितले.

गायकवाड यांनी अशा सलोखा परिषदा राज्यभर करण्याची गरज मांडली. संविधानिक आरक्षण संरक्षणासाठी आणि खासगी क्षेत्रातील आरक्षणासाठी आपण एकत्रित यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. नवबौद्ध आणि मांग समूहातील सलोखा टिकावा यासाठी वर्गीकरणाभोवतीचे मतभेदांचे निर्मूलन करण्यासाठी बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा, वर्गीकरणाचे स्वरूप, प्रारूप ठरविताना सर्वजातीय प्रतिनिधींना विचारात घेण्याच्या प्रक्रियेत मानव्यशाखांचे अभ्यासक, संशोधक यांचा सहभाग असावा, आदी मागण्या करण्यात आल्या.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास 'सीएसआर'मधून बस

नाशिक : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक व प्रशिक्षणविषयक गरजा लक्षात घेऊन आयडीबीआय बँकेने सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) ५० आसनी बस उपलब्ध केली आहे.

या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक भेटी, ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण, क्षेत्रीय अभ्यास तसेच विविध शैक्षणिक व प्रशिक्षणात्मक उपक्रमांसाठी सुरक्षित व नियोजनबद्ध वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी अधिष्ठाता तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्यंकट गीते यांनी बससाठी विशेष पुढाकार घेतला. या बसचे प्रा. डॉ. गीते यांच्या हस्ते पूजन केले. यावेळी आयडीबीआयचे प्रादेशिक प्रमुख आशिष सिंह यांनी बसची चावी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संदीप गुंडरे यांच्याकडे सुपूर्द केली. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची एकाच वेळी सुरक्षित व सुलभ वाहतूक करण्यासाठी स्वतंत्र बसची आवश्यकता होती.

ICICI Bank **शाखा कार्यालय :** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११.

जाहीर सूचना - तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदींकडे पहा]
स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ अन्वये तसेच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या परतूकासह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य लोक आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज करण्यात आली असून, त्याचा **सांकेतिक ताबा** आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे'' आणि ''तेथे जे असेल ते'' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्र.	कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	अवतार ट्रेडिंग कंपनी (कर्जदाराचे), श्रीमती सपना अरविंद आरडेजा, श्री अरविंद कन्हैयालाल आरडेजा (हमीदाराचे/ गहाणखत) कर्ज खाते क्र. 037505008245	फ्लॅट क्र. ५०१, पाचवा मजला, ओम श्री गुरुमंता रेसिडेन्सी, प्लॉट क्र. ४-ए, नवीन सिटी सर्व्हे क्र. ५५२० (जुना सिटी सर्व्हे क्र. ४३३/२), गणपती नगर, गाव मेहरुण, जिल्हा जळगाव, महाराष्ट्र– ४२५००१. मोजमापित क्षेत्र- ९७.१०० चौरस मीटर कार्पेट आणि तळमजल्यावरील भूखंडाचा अविभाजित भाग ४४.३३ चौरस मीटर इतका आहे.	₹ २,७४,३७, ५५५/- सप्टेंबर ०५, २०२६ पर्यंत	₹ १,२०,००, ०००/- ₹ १२,००, ०००/-	ऑक्टोबर ०७, २०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५:०० पर्यंत	ऑक्टोबर २७,२०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव वेबसाईट– (URL Link-https://BidDeal.in) व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या ई–लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **ऑक्टोबर १६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **ऑक्टोबर १६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **ऑक्टोबर १६, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह – डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११** येथे **ऑक्टोबर १६, २०२६** रोजी संध्याकाळी **५.००** वाजेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/ वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **नाशिक** येथे देय सादर करावा.
पाहणीसंबंधित, ई–लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया संपर्क **आयसीआयसीआय बँक लिमिटेड** के फोन नंबर **७९७७२७२४८१/ ९५६१०८७५२२** वर संपर्क करा.
कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : सप्टेंबर १०, २०२६, ठिकाण : नाशिक **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

HDFC BANK We understand your world **एचडीएफसी बँक लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक लि., एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३
शाखा कार्यालय : एचडीएफसी बँक लि., नक्षत्र बिझनेस हब, बँक हाऊस, पहिला मजला, पाईपलाईन रोड, आनंदवली, गंगापूर रोड, नाशिक–४२२०१३

ताबा सूचना

(अधिनियमाच्या कलम १३ (४) अन्वये, सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी नियम, २००२च्या नियम ८सह वाचून)
ए. एचडीएफसी बँक लि.चे अधिकृत अधिकारी या नात्याने, ज्यांचे कार्यालय एचडीएफसी बँक लि., डेटा प्रोसेसिंग सेंटर, तळमजला, गुरुप्रसाद हाऊसिंग सोसायटी समोर, बंड गार्डन रोड, पुणे-४११००१ येथे आहे, यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ९ सह वाचन केलेल्या कलम १३(२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार **श्री. शक्तिसिंग विलासराव ढोमसे, विलासराव ढोमसे यांचे सुपुत्र आणि इतर (कर्ज क्रमांक ५०२०००७५२२३९९२, ५०२०००७५२५२१२४, ५०२०००७५२५९३०० आणि ८७०७५०५७)** यांना दिनांक **०३ जून २०२६** रोजी मागणी सूचना जारी केली. सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु. ४३,११,२६०.०८/– **(त्रेचाळीस लाख अकरा हजार दोनशे साठ रुपये आणि आठ पैसे)** परत करावी. या रकमेपैकी **रु. ४१,४०,३२६.०८/– मुद्दल, तर रु. १,७०,९३४.०० व्याज/दंडात्मक व्याज**, भविष्यातील व्याज आणि दंडात्मक व्याज, विलंब शुल्क, खर्च इत्यादींसाठी आहे.
कर्जदार आणि इतरांनी मागणी केलेली रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने उक्त कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये उक्त नियमांच्या नियम ८सह वाचून त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा **०८ सप्टेंबर २०२६** रोजी घेतला आहे.
विशेषत : कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, त्यांनी मालमत्तेचा कोणताही व्यवहार करू नये आणि अनुसूचीतील मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार मे. एचडीएफसी बँक लि. यांच्याकडे **दिनांक १६ एप्रिल २०२६** रोजीच्या हिशोबाने **रु. ४३,११,२६०.०८/– (त्रेचाळीस लाख अकरा हजार दोनशे साठ रुपये आणि आठ पैसे)** इतक्या रकमेसाठी बोजा असेल. अधिक लागू होणारे भविष्यातील व्याज आणि त्यावरील अनुषंगिक शुल्क.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

सुरक्षा : मालेगावच्या उपनिबंधकाकडे मालकी हक्काची कागदपत्रे जमा करून केलेल्या गहाण/ एनओआयच्या मागील व्यवहाराची नोंद करणारे ठेवपत्र, ज्याचा दस्तऐवज क्रमांक **LSL-3786/2022** दिनांकित **२३ नोव्हेंबर २०२२** आहे. मालकी हक्काची कागदपत्रे जमा करून केलेल्या गहाण/एनओआयच्या मागील व्यवहाराची नोंद करणारे ठेवपत्र. **जी. नं. ३३४/३ हिस्सा नं. ५८ प्लॉट नं. १, मंगरूळ एसर, गुरुद्वारा रोड जवळ, नाशिक, चांदवड, नाशिक,** याच्या भागावर नोंदणीकृत गहाण ठेवलेली ही सर्व मालमत्ता आहे.

मालकाचे नाव	प्रकार/ स्वरूप	मालमत्तेचा पत्ता	क्षेत्रफळ
१. श्री. शक्तीसिंह विलासराव ढोमसे, विलासराव ढोमसे यांचा पुत्र	एनए प्लॉट मालमत्ता	चांदवड, नाशिक येथील नोंदणीकृत गहाण जी.नं. ३३४/३ हिस्सा नं. ५८ प्लॉट नं. १, मंगरूळ एसर, गुरुद्वारा रोड जवळ, चांदवड नाशिक. **चार सीमा खालीलप्रमाणे:** १. पूर्व- शहर नोंदीनुसार, २. पश्चिम- शहर नोंदीनुसार, ३. दक्षिण- शहर नोंदीनुसार, ४. उत्तर- शहर नोंदीनुसार	एडीएम. एच. ६७६.०० चौ. मीटर.

त्यावरील सर्व झाडे, उभी व आडवी पिके आणि त्यावर बांधलेल्या किंवा बांधल्या जाणाऱ्या इमारतींसहित
दिनांक : ०८/०९/२०२६ **आपला विश्वासू, एचडीएफसी बँक लि.साठी**
ठिकाण : नाशिक **प्राधिकृत अधिकारी**
विशाल ए. पथडे
नोट : संबंधीत जाहिरातीचे भाषांतर इंग्रजीवरून करण्यात आले आहे, तरी अधिक अचूक माहितीसाठी इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरण्यात येईल.

peoplehome पीपल होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीचे नाव कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड) सीआयएन क्रमांकः U65990MH2017PLC472040
नोंदणीकृत कार्यालयः १९ डब्ल्यू - सी विंग, द रुबी, २९ सेनापती बापट मार्ग, दादर पश्चिम, मुंबई- ४०००२८, महाराष्ट्र www.peoplehome.in ।। दूरध्वनी क्रमांकः +९१ २२ ४५०३६०००

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी) [(परिशिष्ट IV) नियम ८(१)]

यास्तव, मी, **पीपल होम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीचे नाव कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड), **[CIN NO. U65990MH2017PLC472040]** चा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ (''अ‍ॅक्ट'') अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२च्या नियम ३सह वाचन केलेल्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्ज खाते क्रमांक **HLNHFLNAS0020720 आणि HLNLAPNAS0020721** कर्जदार **सविता योगेश घुले आणि योगेश देवराम घुले** यांना, मागणी सूचनेत नमूद केलेली एकूण रक्कम **रु. १२,७५,००८/- (भारतीय रुपये बारा लाख पंचाहत्तर हजार आठ फक्त) आणि रु. २,७०,४६९/- (भारतीय रुपये दोन लाख सत्तर हजार चारशे एकोणसत्तर फक्त)** रक्कम परतफेड करण्यासाठी, दिनांक **१६.०६.२०२६** रोजी एक मागणी सूचना जारी केली. **०९.०६.२०२६** रोजीनुसार, कर्ज करारानुसार **१०.०६.२०२६** पासुन लागू होणाऱ्या पुढील व्याज आणि शुल्कांसह, सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत जमा करावी.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (४) अन्वये सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८सह वाचून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **०७.०९.२०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार **पीपल होम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीचे नाव कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड) यांच्याकडून, दिनांक **०९.०६.२०२६** रोजीच्या रकमेनुसार **रु. १२,७५,००८/- (भारतीय रुपये बारा लाख पंचाहत्तर हजार आठ) आणि रु. २,७०,४६९/- (भारतीय रुपये दोन लाख सत्तर हजार चारशे एकोणसत्तर)** इतक्या रकमेवर, उपरोक्त नमूद केल्यानुसार पुढील व्याज आणि शुल्कासह बोजास पात्र असेल.
तारण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८)च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

मौजे तालुका/ जिल्हा नाशिक येथील ग्रामपंचायत स.नं. २९३ असलेल्या ग्रामपंचायत मिळकत नं. २७३/अ ची ६०० चौरस फूट क्षेत्रफळाची संपूर्ण जागा, सर्व हक्कांसहित (ज्यात सामायिक जागा, सुविधा, सोयी, विकास हक्क इत्यादी (लागू असेल त्याप्रमाणे) वापरण्याचे आणि ताब्यात घेण्याचे हक्क समाविष्ट आहेत, पण तेवढ्यापुरते मर्यादित नाहीत), आणि त्यास संलग्न असलेले सर्व फर्निचर, फिक्स्चर, फिटिंग्ज आणि इतर वस्तू. **सीमाः** पूर्वः रस्ता, पश्चिमः खाजगी मालमत्ता, उत्तरः गट नं. १/३, दक्षिणः रस्ता.

प्राधिकृत अधिकारी
दिनांक: ०७.०९.२०२६ **पीपल होम फायनान्स लिमिटेड**
ठिकाण: गोल्हाणे, (नाशिक) **(पूर्वीचे नाव कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड)**

Reform ARC LIMITED रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वीचे नाव रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड)
दुसरा मजला, आयसीसी चेंबर्स, साकी विहार रोड, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंजजवळ, पवई, मुंबई ४०००७२

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीची सूचना
[नियम ६(२) सोबत नियम ८(६) पहा]
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अन्वये, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदींसह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार(रां)ना आणि जामीनदार(रां)ना) सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनकोकडे गहाण/ तारण ठेवलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर/ जंगम मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे.
की, **रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लि.** ने दिनांक २९.०३.२०२३ रोजीच्या हस्तांतरण करारनाम्याद्वारे, खाली नमूद केलेल्या कर्ज खात्यांची आर्थिक मालमत्ता/ कर्जे, त्यावरील हक्क, मालकी आणि हितसंबंधांसह, तसेच त्यामागील प्रतिभूतींसह, आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट आणि आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्टचे विश्वस्त असलेल्या रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वीचे नाव रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड) यांच्या नावे हस्तांतरित केली आहेत. सदर हस्तांतरणामुळे, आम्ही तुमचे सुरक्षित धनको झालो आहोत आणि संपूर्ण करारानुसार देय रक्कम वसूल करण्यास कायदेशीररित्या पात्र आहोत.
म्हणून, आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट आणि आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्टचे विश्वस्त, रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वीचे नाव रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड) यांचे स्वाक्षरी करणारे अधिकृत अधिकारी, याद्वारे आपणास ३० दिवसांची नोटीस देत आहेत की, खाली नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्ता, कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम, अधिक भविष्यातील व्याज आणि खर्च वसूल करण्यासाठी, स्वाक्षरी करणाऱ्याद्वारे १४.१०.२०२६ रोजी 'जशी जेथे आहे तशी', 'जे काही आहे ते', आणि 'तेथे जे काही असेल ते' या तत्त्वावर ई-लिलावाद्वारे विकल्या जातील. ही वसुली आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्टचे विश्वस्त आणि सुरक्षित धनको म्हणून रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांना, नमूद केलेल्या कर्जदार/ गहाणदारांकडून देय आहे. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम (ईएमडी) खालीलप्रमाणे आहेत:

गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन:

लॉट क्र.	कर्जदाराचे नाव, मालमत्तेचा तपशील, मागणी सूचना आणि ताबा मिळण्याची तारीख	राखीव किंमत / ईएमडी
	आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट,	
१	**मंगल जगदीश पेंढारकर (कर्जदार)** ४३/१, स. क्र.-१/१/३, मिताली क्लासिक, जी.डी. सावंत कॉलेज जवळ, पाथर्डी फाटा, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०१०. **तसेच येथे:** री हाउस नं.-१, साईश्री रो हाऊसेस, प्लॉट नं. २९, सर्व्हे क्र. ३२६/१/१/३, शहर एसएन क्र. ७८५९च्या बाहेर, गाव पाथर्डी तालुका आणि जि. नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक. **तसेच येथे:** एच/०३/१७, आर्ट स्वरूप्या मागे, एमआयडीसी- अंबड, नाशिक नाशिक महाराष्ट्र- ४२२०१० **२. जगदीश गोपीनाथ पेंढारकर ४३/१,** एस क्र.- १/१/३, मिताली क्लासिक, जी.डी. सावंत कॉलेज जवळ, पाथर्डी फाटा, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०१०. **तसेच येथे:** रो हाउस नं.-१, साईश्री रो हाऊसेस, प्लॉट नं. २९, सर्व्हे क्र. ३२६/१/१/३, शहर एसएन क्र. ७८५९च्या बाहेर, गाव पाथर्डी तालुका आणि जि. नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक. **तसेच येथे:** एच/०३/१७, आर्ट स्वरूप्या मागे, एमआयडीसी- अंबड, नाशिक नाशिक महाराष्ट्र- ४२२०१० **मालमत्ता:** पाथर्डी गाव, तालुका व जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक येथील प्लॉट नं. २९, सर्व्हे नं. ३२६/१/१/३, शहर एसएन नं. ७८५९च्या बाहेर बांधलेल्या साईश्री रो हाऊसेसमधील रो हाउस नं.-१चा संपूर्ण तुकडा (क्षेत्रफळ ९०.३० चौ. मीटर). **मागणी सूचना:** रु. २४,९१,५६३.०२/- (रु. चोवीस लाख एक्याण्णव हजार पाचशे त्रेसष्ट पैसे दोन फक्त) दिनांक १२.०९.२०१८ रोजीनुसार अधिक भविष्यातील व्याज व खर्च रचनात्मक/ प्रत्यक्ष ताब्याची तारीख: १०.०८.२०२६	रु. ३२,१४,४००/- / रु. ३,२१,४४०/-
	आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट	
२	**ज्ञानेश्वर साहेबराव मोरे साहेबराव शंकर मोरे** यांचा मुलगा घर क्र. १८८१ (८), निफाड, तालुका निफाड, नाशिक, महाराष्ट्र- ४२२३०३. **तसेच येथे:** घर क्रमांक ८, गट क्रमांक ३९८/३/४, गाव निफाड, ता. निफाड, जि. नाशिक, महाराष्ट्र. **तसेच येथे:** इमेज फॅशन गॅलरी, ३४०/२ डी, शनिमंदिर रोड, निफाड तालुका, नाशिक, महाराष्ट्र- ४२२३०३ **२. निर्मला साहेबराव मोरे** घर. क्र. १८८१ (८), निफाड, तालुका निफाड, नाशिक, महाराष्ट्र- ४२२३०३ मोब. क्रमांक:- +९१९५२७३३३८१३ **तसेच येथे:** घर क्रमांक ८, गट क्रमांक ३९८/३/४, गाव निफाड, ता. निफाड, जि. नाशिक, महाराष्ट्र, **तसेच येथे:** इमेज फॅशन गॅलरी, ३४०/२ डी, शनिमंदिर रोड, निफाड तालुका, नाशिक, महाराष्ट्र- ४२२३०३ **मालमत्ता:** रो हाऊस क्र. ८, क्षेत्रफळ ४९.३४ चौ. मी. बांधकाम + मोकळी जागा क्षेत्रफळ १४.७० चौ. मी., भूखंड क्र. ३ ते ६ वर बांधलेले, गट क्र. ३९८/३/४ पैकी, गाव निफाड, ता. निफाड, जि. नाशिक, महाराष्ट्र- ४२२३०३. **मागणी सूचना:** रु. ९,१८,९७२.६४/- (केवळ रुपये नऊ लाख अठरा हजार नऊशे बहात्तर आणि पैसे चौसष्ट) दिनांक २१.०५.२०२१ रोजीनुसार अधिक भविष्यातील व्याज आणि खर्च. रचनात्मक/ प्रत्यक्ष ताब्याची तारीख: ०९.०३.२०२६	रु. ७,५६,०००/- / रु. ७५,६००/-

मालमत्तेची तपासणी : १२.१०.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत
निविदा सादर करण्याची अंतिम तारीख : १३.१०.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
ई-लिलावाची तारीख : १४.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० दरम्यान, प्रत्येक वेळी ५ मिनिटांच्या मुदतवाढीसह

विक्रीच्या अटी आणि शर्ती:- १. मालमत्ता राखीव किमतीपेक्षा कमी किमतीत विकली जाणार नाही आणि ही विक्री, एक सुरक्षित धनको म्हणून रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वीचे नाव रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड) यांच्या पुष्टीकरणाच्या अधीन असेल. २. ई-लिलाव मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्यामार्फत प्लॉट नं. ६८, गुरगाव, हरियाणा, पिन कोड १२२००३ येथे ऑनलाइन आयोजित केला जाईल. ३. ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी, इच्छुक बोलीदारांकडे एक वैध ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे आणि त्यांनी www.bankeauctions.com या पोर्टलवर आपल्या नावाची नोंदणी करावी आणि मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याकडून आपला युझर आयडी आणि पासवर्ड मिळवावा. ४. इच्छुक बोलीदार मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याकडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. (संपर्क व्यक्ती: श्री. धरणी कृष्णा, मोबाईल +९१ ९९४८१८२२२२, Delhi@c1india.com किंवा Support@bankeauctions.com (हेल्पलाईन क्रमांक ७२९१९८११२४,२५,२६). ५. आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट प्रॉपर्टीसाठी बयाणा रक्कम (ईएमडी) आरटीजीएस/एनईएफटी फंड ट्रान्सफरद्वारे चालू खाते क्रमांक ६७४२५५७०८८ मध्ये जमा केली जाईल. बँकेचे नाव: इंडियन बँक, शाखा: सांताक्रूझ पश्चिम शाखा, मुंबई, ४०००५४, लाभार्थ्याचे नाव: आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट, आयएफएससी कोड: IDIB000S010. कृपया नोंद घ्यावी की बयाणा रकमेसाठी चेक/ डिमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत. ६. आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट प्रॉपर्टीसाठी बयाणा रक्कम (ईएमडी) चालू खाते क्रमांक १२२५०५००२१४६ मध्ये आरटीजीएस/ एनईएफटी निधी हस्तांतरणाद्वारे जमा केले जाईल. बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लि. शाखा: वीरा देसाई शाखा, मुंबई, ४०००५८, लाभार्थ्याचे नाव: ०८० आरएआरसी (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट, आयएफएससी कोड: ICIC0001225. कृपया नोंद घ्यावी की ईएमडीसाठी चेक/ डिमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत. ७. राखीव किमतीपेक्षा कमी आणि/ किंवा ईएमडी रकमेशिवाय असलेल्या बोली स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदार प्रति लॉट रु. ५०००च्या पटीत आपली पुढील बोली रक्कम वाढवू शकतात. ८. यशस्वी बोलीदाराने यशस्वी बोलीदार घोषित झाल्यानंतर लगेचच बोली रकमेच्या/ विक्री किमतीच्या २५% रक्कम (ईएमडीसह) जमा करावी. यशस्वी बोलीदाराने बोली रकमेच्या/ विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम यशस्वी बोलीदार घोषित झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करावी. ९. जर यशस्वी बोलीदार वर नमूद केल्याप्रमाणे विक्री किंमत जमा करण्यात अयशस्वी ठरला, तर ईएमडीसह सर्व ठेवी जप्त केल्या जातील. १०. अयशस्वी बोली लावणाऱ्यांची अनामत रक्कम ई-लिलाव विक्री प्रक्रिया बंद झाल्यानंतर सात दिवसांच्या आत व्याजाशिवाय परत केली जाईल. ११. अधिकृत अधिकाऱ्याने दिलेला तपशील त्याच्या सर्वोत्तम ज्ञान, विश्वास आणि नोंदीनुसार नमूद केला आहे. अधिकृत अधिकारी कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळणे इत्यादींसाठी जबाबदार राहणार नाही. १२. अधोस्वाक्षरी करणाऱ्या अधिकृत अधिकाऱ्याला कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, किंवा विक्री स्थगित/ विलंबित/ रद्द करण्याचा, किंवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय किंवा कोणतेही कारण न देता विक्रीच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. १३. बोली लावणाऱ्यांनी मालमत्तेवरील शुल्क/ बोजा/ वैधानिक देयता यासंबंधी विवेकपूर्वक चौकशी करावी आणि आपली बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेचे शीर्षक, विस्तार, गुणवत्ता याबद्दल स्वतःची खात्री करून घ्यावी. ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर मालमत्तेवरील शुल्क, बोजा आणि इतर कोणत्याही बाबी इत्यादींबाबत कोणत्याही स्वरूपाचा दावा स्वीकारला जाणार नाही. १४. उपलब्ध नोंदीनुसार, अधोस्वाक्षरी करणाऱ्याकडे या सूचनेच्या तारखेनुसार मालमत्तेवरील कोणत्याही बोज्याबद्दल माहिती नाही. १५. मालमत्तेवरील कोणतीही थकबाकी, देय रक्कम, कर, व्हॅट, टीडीएस, जीएसटी, वैधानिक किंवा अन्य प्रकारचे शुल्क, मालमत्तेच्या विक्रीवरील मुद्रांक शुल्क/ नोंदणी शुल्कासह, केवळ खरेदीदारानेच सोसायचे आहे. इतर कोणत्याही माहितीसाठी, कृपया १८००१०२९७११/१८६०२६६४१११/ १८००२०९९७११ या क्रमांकांवर संपर्क साधा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१) अंतर्गत वैधानिक ३० दिवसांची नोटीस
*कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ई-लिलावापूर्वी वर नमूद केलेली रक्कम, अद्ययावत व्याज आणि आनुषंगिक खर्चासह भरावी; असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तेचा ई-लिलाव होईल आणि कोणतीही थकबाकी असल्यास ती व्याज/ खर्चासह वसूल केली जाईल. लिलावासाठी निश्चित केलेल्या तारखेला लिलाव विक्रीमध्ये कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास, सुरक्षित धनको हा निश्चित केलेल्या राखीव किमतीवर किंवा त्याहून अधिक किमतीवर ही मालमत्ता कोणत्याही संभाव्य खरेदीदाराला खाजगी कराराद्वारे विकण्यास स्वतंत्र असेल. कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी गहाण मालमत्तेचा ताबा घेताना तयार केलेल्या पंचनामा/ मालसूची अहवालानुसार, ताब्यात घेतलेल्या मालमत्तेत असलेल्या सर्व घरगुती वस्तू/ वैयक्तिक सामान (असल्यास) या सूचनेच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत हलवावे/ काढून टाकावे. या सूचनेच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या विहित कालावधीत घरातील वस्तू/ वैयक्तिक सामान हलवण्यात अयशस्वी झाल्यास, कंपनी कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांच्या जोखमीवर, जबाबदारीवर आणि खर्चावर, 'जसे जेथे आहे तसे', तेथे जे काही आहे, तेथे जे असेल ते या तत्त्वावर त्या वस्तू काढून टाकण्यास/ हलवण्यास/ विल्हेवाट लावण्यास बांधील असेल. या संदर्भात कोणत्याही पद्धतीने केलेल्या कोणत्याही दाव्यासाठी कंपनी जबाबदार राहणार नाही.
ठिकाण: महाराष्ट्र **अधिकृत अधिकारी - रिफॉर्म एआरसी लिमिटेड**
दिनांक: १०.०९.२०२६ **(पूर्वीचे नाव रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड)**
टीप: सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केल्यानंतर भरलेली कोणतीही रक्कम, वसुली/ निपटाऱ्याच्या वेळी देय असलेली रक्कम निश्चित करण्यासाठी विचारात घेतली जाईल.

YES BANK येस बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : येस बँक हाऊस, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००५५. **शाखा :** १९वा मजला, एम्पायर टॉवर, रिलायबल टेक पार्क, क्लाउड सिटी कॅम्पस, प्लॉट क्र. ३१, ठाणे बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२च्या तरतुदींनुसार, खाजगी करारामार्फत कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाण ठेवणारा यांना स्थावर मालमत्तेच्या विक्रीची सूचना.
प्रति,

१. **श्री. देवेश देवेंद्रकुमार सोनी (कर्जदार आणि गहाण ठेवणारे)**
शरदचंद्र पवार मार्केट यार्ड, जोपूल रोड, पिंपळेगाव बसवंत, नाशिक - ४२२२०९,
आणि येथेदेखील : फ्लॅट क्र. ३०२, सम्राट गोकुळ धाम, हिरावाडी, कमला नगर, नाशिक - ४२२००३,
आणि येथेदेखील : कार्यालय क्र. १, ३ आणि १०, १ला मजला, प्रसाद चेंबर्स अ.क्र. ३९/अ/८, प्लॉट क्र. १/२, विजय ममता यांच्यासमोर, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, वडाळा शिवार, ता. आणि जि. नाशिक, महाराष्ट्र - ४२२०११.

२. **श्रीमती मिताली देवेश सोनी (सह-कर्जदार १ आणि गहाण ठेवणारे)**, फ्लॅट क्र. ३०२, सम्राट गोकुळ धाम, हिरावाडी, कमला नगर, नाशिक - ४२२ ००३
आणि येथेदेखील : कार्यालय क्र. १, ३ आणि १०, १ला मजला, प्रसाद चेंबर्स अ. क्र. ३९/अ/८, प्लॉट क्र. १/२, विजय ममता यांच्यासमोर, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, वडाळा शिवार, ता. आणि जि. नाशिक महाराष्ट्र - ४२२०११

३. सर्वसामान्य जनतेसाठी

प्रिय महोदया/महोदय,
विषय : तारण ठेवलेल्या मालमत्तेची, म्हणजेच कार्यालय क्र. १, ३ आणि १०, १ला मजला, प्रसाद चेंबर्स, अ. क्र. ३९/ए/८, प्लॉट क्र. १/२, विजय ममता यांच्या समोर, बोधले नगर, नाशिक–पुणे रस्ता, वडाळा शिवार, ता. व जि. नाशिक, महाराष्ट्र - ४२२०११, **खाजगी कराराद्वारे विक्री.**
संदर्भ : सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८ अन्वये विक्री सूचना **ग्राहक आयडी : १५८०९९११-एसईबी**

निम्नस्वाक्षरीकार पुढील बाब आपल्या निदर्शनास आणून देत आहे :
१. सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८ आणि ९ सहवाचता सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (**"सरफेसी कायदा"**) च्या अनुषंगाने, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने सरफेसी अ‍ॅक्टच्या कलम १३(२) अन्वये तुम्हाला दिनांकित २३ जून २०२३ रोजी जारी केलेल्या मागणी सूचनेनुसार, रु. २,११,९८,४६३/– (रुपये दोन कोटी अकरा लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे त्रेसष्ट फक्त) दि. २३ जून २०२३ रोजीनुसारच्या सुरक्षित कर्जाची, पुढील व्याज, खर्च आणि इतर शुल्क इत्यादींसह वसुली करण्यासाठी, दि. २५ जून २०२६ रोजी सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. तारण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील खालील अनुसूचीमध्ये अधिक स्पष्टपणे वर्णन केला आहे आणि यापुढे तिचा उल्लेख अनुसूची **'अ' मालमत्ता** असा केला जाईल.
२. अ अनुसूचीतील मालमत्तेचा ताबा मिळाल्यावरोबर, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने विविध प्रसंगी जाहीर लिलाव आयोजित केले आहेत आणि शेवटचा लिलाव दि. ३० जुलै २०२६ रोजी रु. १,०२,३४,३५०/– च्या आरक्षित किमतीवर झाला होता. लिलावाचा तपशील वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. सदर नोटिसा तुम्हालाही बजावण्यात आल्या होत्या. सर्वतोपरी प्रयत्न करूनही, अधिकृत अधिकाऱ्याला जनतेकडून बोली मिळवता आली नाही.
३. आम्ही आपणास कळविण्यात येते की, आम्हाला एका संभाव्य खरेदीदाराकडून खाजगी कराराद्वारे शेवटच्या लिलावाच्या किमतीवर तारण ठेवलेली मालमत्ता रु. १,०२,३४,३५०/– यामध्ये खरेदी करण्याची इच्छा दर्शवणारा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
४. तुम्हाला १५ दिवसांची नोटीस देण्यात येत आहे, सदर ही मुदत संपल्यानंतर, रु. ३,७२,४९,१८५.७० (रुपये तीन कोटी बहात्तर लाख एकोणपन्नास हजार एकशे पंचाऐंशी आणि सत्तर पैसे फक्त) दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजीनुसार ही संपूर्ण देय रक्कम दि. ०२ सप्टेंबर २०२६ रोजीपासून संपूर्ण देय रक्कम वसूल होईपर्यंत त्यावरील पुढील व्याज आणि शुल्कासह एकत्रित, संपूर्ण देय रक्कम न भरल्यास, अनुसूची 'अ' मधील मालमत्ता पुढील नोटीस न देता **"खाजगी करार"** द्वारे विकली जाईल.
५. आम्ही तुम्हाला पुढे कळवू इच्छितो की, जर तुमच्याकडे सदर मालमत्तेसाठी चांगल्या किमतीत इच्छुक खरेदीदार असेल, तर तुमचा खरेदीदार बँकेसोबत ठरलेल्या अटी व शर्तींनुसार मालमत्ता खरेदी करण्यासाठी बँकेकडे संपर्क साधण्यास पात्र आहे, अन्यथा, सरफेसी नियमांच्या नियम ८(८) अंतर्गत नमूद केलेल्या प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करून मालमत्ता खाजगी कराराद्वारे विकली जाईल.
६. याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या खरेदीसाठी, इच्छुक संभाव्य खरेदीदारांना त्यांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.
७. जर कर्जदार/जामीनदाराने विक्रीच्या तारखेपूर्वी बँकेला देय असलेली रक्कम पूर्णपणे भरली, तर सरफेसी कायद्याच्या कलम १३(८) यानुसार कोणतीही विक्री पूर्ण होणार नाही.
८. बँकेला उपलब्ध असलेल्या इतर हक्क आणि उपाययोजनांवर कोणताही परिणाम न करता सदर ही सूचना तुम्हाला जारी करण्यात येत आहे.

अनुसूची अ
तारण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन

१. कार्यालय क्र. १, मोजमापे क्षेत्रफळ ८३.०४ चौ. मी. कार्पेट एरिया, १ल्या मजल्यावर, "प्रसाद चेंबर्स" नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत प्लॉट क्र. १२ वर बांधलेली, सर्वेक्षण क्र. ३९/ए/८ यापैकी, येथे बोधले नगर, वडाळा शिवार, विजय ममता यांच्या समोर, नाशिक–पुणे रस्ता, ता. व जि. नाशिक महाराष्ट्र - ४२२०११ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, श्री. देवेश देवेंद्रकुमार सोनी आणि श्रीमती मिताली देवेश सोनी यांच्या मालकीचे;
२. कार्यालय क्र. ३, मोजमापे क्षेत्रफळ ४३.५८ चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ, १ल्या मजल्यावर, "प्रसाद चेंबर्स" नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. १२ वर बांधलेले, सर्वेक्षण क्र. ३९/ए/८ यापैकी, येथे बोधले नगर, वडाळा शिवार, विजय ममता यांच्या समोर, नाशिक–पुणे रस्ता, ता. व जि. नाशिक महाराष्ट्र - ४२२०११ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, श्री. देवेश देवेंद्रकुमार सोनी आणि श्रीमती मिताली देवेश सोनी यांच्या मालकीचे; आणि
३. कार्यालय क्र. १०, मोजमापे क्षेत्रफळ ३२.२६ चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ, १ल्या मजल्यावर, "प्रसाद चेंबर्स" नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. १/२ वर बांधलेले, सर्वेक्षण क्र. ३९/ए/८ यापैकी, येथे बोधले नगर, वडाळा शिवार, विजय ममता यांच्या समोर, नाशिक–पुणे रस्ता, ता. व जि. नाशिक महाराष्ट्र - ४२२०११, श्री. देवेश देवेंद्रकुमार सोनी आणि श्रीमती मिताली देवेश सोनी.

येस बँक लि. यांच्यासाठी
अधिकृत अधिकारी